जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १४२ दिनांक - २७/०२/२०२४**

बिबवेवाडी पोलीस स्टेशन पुणे

## एक वर्षापुर्वी चे भांडणाचा राग मनात धरून मित्रांचे मदतीने कट रचून गंभीर दुखापत करणा-या आरोपीना शिरवळ येथे पाठलाग करून केले जेरबंद

दिनांक २१/०२/२०२४ रोजी फिर्यादी ओळखत असलेले इसम नामे ओंकार थोरात रा.जांभुळवाडी कात्रज पुणे,चिक्या लोखंडे रा.धनकवडी पुणे व त्यांचे आणखी दोन साथीदार यांनी फिर्यादी यांचेशी झालेल्या जुन्या भांडणाचे कारणावरून व फिर्यादी यांचे मित्रास शिवीगाळ करून त्या चौघांनी त्यांचे हातातील लोखंडी धारदार हत्यारांनी त्याचे डोक्यात मागील बाजुस,मानेवर,उजवे हाताचे दंडावर,उजवे हाताचे बोंटावर व दोन्ही पायांचे पंजावर वार करून गंभीर जखमी करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला व सदर मदतीसाठी आलेल्या लोकांचे दिशेने हत्यारे फिरवून दहशत केली म्हणून फिर्यादी त्यांचे विरूध्द **बिबवेवाडी पो स्टेगु.र. नं. ४१/२०२४ भादवि कलम ३०७,५०६,५०४,१२० (ब)३४, महाराष्ट्र अधि.१९५१ चे कलम ३७(१) सह १३५ व फौजदारी सुधारणा अधि.१९३२ चे कलम ७** तक्रार दिलेने गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्हयातील आरोपींचा सपोनि श्री.प्रविण काळुखे,तपास पथकातील स्टाफ असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बिबवेवाडी पोलीस ठाणे पुणे श्री.विनय पाटणकर यांचे मार्गदर्शनाखाली व त्यांनी केलेल्या सुचनाप्रमाणे आरोपींचा शोध घेत असताना वरील नमुद आरोपी यांचे तांत्रिक विश्लेषण व्दारे व गुप्त बातमीदामार्फत मिळालेल्या बातमीवरून दाखल गुन्हयातील आरोपी हे ता.खंडाळा,जि.सातारा येथे असल्याचे माहिती प्राप्त झालेने आरोपी नामे **१) शुभम ऊर्फ चिक्या भास्कर लोखंडे,वय २० वर्षे रा.म्हस्के चाळ, शेवटचा बसस्टॉप जवळ,धनकवडी पुणे.२) सुरज नितीन क्षिरसागर,वय २० वर्षे रा.लक्ष्मी नगरगजाजन महाराज मठ समोर दत्तवाडी पुणे. ३) तौकिर रफिक शेख,वय २० वर्षे रा.मक्का मस्जिद बाजुला,गल्ली नं.०१,नवाजीत चौक कोंढवा पुणे.**व एक विधीसघर्षित बालक यांचा पाठलाग करून त्यांना ताब्यात घेवून त्यांचेकडे तपास करता दाखल गुन्हयातील फिर्यादी व साक्षीदार यांनी ओंकार थोरात याचा हाताचा अंगठा तोडल्याचे कारणावरून त्याचा बदला घेण्याचे उद्देशाने फिर्यादी यांचे मित्रावर लोखंडी हत्याराने वार करून गंभीर जखमी केलेचे निष्पन्न झालेने ओंकार महेश थोरात वय २४ वर्षे रा.घर नं ३०१ तिसरा मजला निपाणे वस्ती कात्रज पुणे यास सदर गुन्हयात अटक करून त्यांचे कडून एक लोखंडी पालघन व एक लोखंडी कोयता,दोन मोटार सायकल असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त श्री मनोज पाटील,पुर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर, मा.पोलीस उप आयुक्त श्री आर.राजा,परिमंडळ ५ पुणे शहर व मा.सहा.पोलीस आयुक्त श्री गणेश इंगळे, वानवडी विभाग पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली व वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विनय पाटणकर,तपास पथकाचे प्रभारी अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक श्री.प्रविण काळुखे, सहा.पो.निरीक्षक, संजय निकुंभ,पोलीस हवालदार,संतोष जाधव, शिवाजी येवले,आशिष गायकवाड,विशाल जाधव,प्रणव पाटील,अभिषेक धुमाळ, ज्योतिष काळे यांनी केली आहे.